


दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ६ । अंक २० । बुधवार ७ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainikaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## बालिकाश्रम रोडवर ५५ वर्षीय व्यक्तीचा भरदिवसा चाकूने भोसकून निर्घृण खून

### दोन तरुणांनी केले कृत्य, हत्येचे कारण अस्पष्ट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरातील अत्यंत गजबजलेल्या बालिकाश्रम रोडवरील न्यू आर्ट्स कॉलेजच्या गेटसमोर एका ५५ वर्षीय व्यक्तीचा दोघांनी पाठीत चाकू खुपसून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना आज सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास घडली. रवींद्र रामभाऊ चव्हाण (वय ५५, रा. बोल्हेगाव) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव असून, या घटनेमुळे नगर शहरात खळबळ उडाली आहे. रवींद्र चव्हाण हे आज संध्याकाळी पाचच्या सुमारास बालिकाश्रम रोड परिसरात होते. त्यावेळी दोन तरुणांनी त्यांच्या पाठीत अचानक चाकू भोसकला. या प्राणघातक हल्ल्यात चव्हाण हे गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडले. ■ पान ४ वर




### हल्लेखोरांनी काढला पळ

बालिकाश्रम रोड ते न्यू आर्ट्स रोड हा परिसर महाविद्यालयीन विद्यार्थी आणि विविध अकॅडमी क्लासेसमुळे नेहमीच गजबजलेला असतो. संध्याकाळची वेळ असल्याने परिसरात विद्यार्थ्यांची आणि नागरिकांची मोठी वर्दळ होती. याच वर्दळीत हा थरार घडल्याने परिसरात बघ्यांची मोठी गर्दी उसळली होती. हल्ला केल्यानंतर दोन्ही हल्लेखोर तरुणांनी घटनास्थळावरून तत्काळ पळ काढला.

### सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे माग काढण्याची कारवाई सुरु

हत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी परिसरातील हॉटेल व इतर आस्थापनांचे सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेण्याची कारवाई सुरू केली असून, त्याआधारे हल्लेखोरांची माहिती काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. याचदरम्यान, न्यू आर्ट्स कॉलेजच्या मैदानावर संशयास्पदरित्या फिरणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याची कसून चौकशी केली जात आहे.

## उपमहापौर धनंजय जाधव यांचा जुन्या महापालिकेत राऊंड

### भोंगळ कारभाराचा व्हिडिओ कॉलद्वारे पंचनामा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महापालिका प्रशासनात शिस्त आणण्यासाठी सातत्याने धडक कारवाया करणारे उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी जुन्या महापालिका कार्यालयाला अचानक भेट दिली. या भेटीदरम्यान महापालिकेचा अत्यंत ढिसाळ आणि भोंगळ कारभार उघडकीस आला असून, नागरिकांचे महत्त्वाचे जुने दप्तर धुळीत अस्ताव्यस्त पडल्याचे समोर आले आहे. या गंभीर प्रकारानंतर उपमहापौरांनी थेट मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना व्हिडिओ कॉल लावून कार्यालयातील दुरवस्थेचा लाईव्ह पंचनामा केला.

गेल्या काही दिवसांपासून जुन्या महापालिका कार्यालयात जन्म-मृत्यू दाखले तसेच इतर विविध दाखले मिळण्यास प्रचंड दिरंगाई होत असल्याच्या अनेक तक्रारी नागरिकांनी उपमहापौर धनंजय जाधव यांच्याकडे केल्या होत्या. कर्मचारी वेळेवर काम करत नाहीत आणि सर्वसामान्यांना हेलपाटे मारावे लागतात, असा संतप्त सूर नागरिकांमध्ये होता. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत उपमहापौरांनी जुन्या महापालिकेत अचानक धाड टाकली.उपमहापौर जाधव यांनी कार्यालयात प्रवेश करताच तेथील रेकॉर्ड रूम आणि विभागांची पाहणी केली.

यावेळी नागरिकांचे अतिशय महत्त्वाचे आणि ऐतिहासिक रेकॉर्ड असलेले जुने दप्तर अत्यंत अस्ताव्यस्त स्थितीत आणि धुळीच्या साम्राज्यात पडलेले त्यांच्या निदर्शनास आले. कागदपत्रांची काळजी घेण्याऐवजी ती वाऱ्यावर सोडल्याचे पाहून उपमहापौरांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना याचा जाब विचारला. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी एक क्षणही वाया न घालवता थेट महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना मोबाईलवरून व्हिडिओ कॉल केला.

जुन्या महापालिकेत दप्तराची कशी दुरवस्था झाली आहे, कागदपत्रे कशी अस्ताव्यस्त पडली आहेत आणि कर्मचाऱ्यांचा कारभार कसा ढिसाळ सुरू आहे, याचे थेट दृश्य त्यांनी व्हिडिओ कॉलद्वारे आयुक्तांना दाखवले.

## सिगारेट चोरणारी आंतरजिल्हा टोळी जाळ्यात

### एलसीबीच्या कारवाईत साडेअकरा लाखांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीगोंदा आणि दौंड येथे दुकाने फोडून लाखो रुपयांच्या सिगारेटची चोरी करणाऱ्या एका आंतरजिल्हा टोळीला अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेनेश जेरबंद केले आहे. या कारवाईत पोलिसांनी ११ लाख ४६ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, एकूण ४ आरोपींना अटक केली आहे.

दिनांक ४ ऑक्टोबर रोजी श्रीगोंदा येथील साहिल ट्रेडर्स या दुकानाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी १० लाख ५ हजार ८०० रुपयांचे सिगारेटचे बॉक्स पळवून नेले होते. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना तांत्रिक ■ पान ४ वर

### कारवाईत यांचा सहभाग

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखालीपोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, सुयोग सुपेकर, राहुल द्वारके, प्रताप देवकाते, विशाल तनपुरे, अमृत आढाव आणि प्रशांत राठोड यांनी सहभाग घेतला.

## कोतवाली, कॅम्प व जामखेड हद्दीत अवैध गुटखा-मावा विक्रेत्यांवर छापे

### पावणेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त, चार गुन्ह्यांची नोंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जामखेड, भिंगार कॅम्प आणि कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध गुटखा आणि मावा विक्री करणाऱ्या अड्ड्यांवर सलग दोन दिवस छापे टाकून एकूण ४ लाख ७२ हजार १२९ रुपयांचा सुगंधित तंबाखू, मावा आणि गुटखा ■ पान ४ वर



## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पंचवीस वर्षाची कारकीर्द सकंल्प,संघर्ष आणि राष्ट्र सेवेसाठी समर्पित - पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पंचवीस वर्षाची कारकीर्द सकंल्प,संघर्ष आणि राष्ट्र सेवेसाठी समर्पित झालेली आहे. विश्वमान्य नेतृत्व म्हणून जगात त्यांचा गौरव होत आहे. विकसित भारताची वाटचाल साध्य करताना विरासत आणि विकास यांचा योग्य समन्वय त्यांनी साधला असल्याचे गौरवोद्गार जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी काढले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय सामाजिक क्षेत्रातील वाटचालीला पंचवीस वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीनेम''विकसित भारत संकल्प सभेचे'' आयोजन करण्यात आले होते.सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृष्य प्रणाली द्वारे पदाधिकारी कार्यकर्त्यांशी संवाद साधला.जिल्ह्याचे प्रभारी लक्ष्मण सावजी प्रदेश उपाध्यक्ष डॉ सुजय विखे पाटील आ.अक्षय कर्डीले आ.विवेक कोल्हे, उपमहापौर धनंजय जाधव जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर दिलीप भालसिंग अध्यक्ष अनिल मोहीते यांच्यासह सर्व पदाधिकारी कार्यकर्ते नागरीक उपस्थित होते.सभेनंतर शहरातून सेवा ज्योत यात्रा काढण्यात आली.महापुरूषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून महाविशाल गणपती मंदीरात प्रधानमंत्र्यांच्या दिर्घायुष्यासाठी महाआरती करण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकीर्दीस पंचवीस वर्ष पूर्ण होत झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून मंत्री विखे पाटील म्हणाले की,२५वर्षाचा हा प्रवास एका व्यक्तिच्या राजकीय कारकीर्दीचा नाही तर,हा संकल्प, संघर्ष,संघटन विकास आणि राष्ट्रसेवेच्या ध्येयाचा आहे.

संघाच्या स्वयंसेवकापासून सुरू झालेला प्रवास देशाच्या पंतप्रधान पदाच्या सर्वोच्च स्थानापर्यत पोहचला त्याचे एकमेव कारण म्हणजे प्रत्येक पदाच्या जबाबदारीत पंतप्रधान मोदी यांनी प्रशासन विकास आणि जनसहभाग केंद्रस्थानी ठेवून काम करण्याचा आदर्श निर्माण केला. प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली अनेक अर्थांनी बदलत्या भारताचा प्रवास आपण पाहात आहोत.सबका साथ, सबका विकास,सबका विश्वास आणि सबका प्रयास हा मंत्र देशाच्या केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या नेतृत्वाखाली गरीब शेतकरी महीला, युवक मध्यमवर्ग, उद्योजक आणि समाजातील वंचित घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे यशस्वी काम प्रत्येक निर्णयातून झाले असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

जनधन योजनेपासून ते डिजिटल व्यवहारांपर्यत आणि घरकुल योजनेपासून ते आयुष्यमान भारत योजनेचा लाभ समाजातील छोट्या घटकांना देवून अंत्योदयाचा मंत्र प्रत्यक्षपणे कृतीत उतरवला गेल्यामुळे सामान्य माणूस देशाच्या विकास प्रक्रीयेशी जोडला गेला आहे. पंचवीस वर्षाच्या यशस्वी कारकीर्दीत झालेले परिवर्तन म्हणजे भारताची डिजीटल वाटचाल,मोबाईल बॅकींग डिजीटल पेमेंट, सरकारी सेवा आणि व्यवहार सामान्य माणसाच्या हातात आले आहेत.युपीआय ही भारताच्या डिजीटल क्षमतेची जगभरात चर्चिली जाणारी ओळख बनली असल्याचे त्यांनी सांगितले.

■ पान ४ वर

## जिल्हा बँकेच्या ५ जागा बिनविरोध होण्याचे संकेत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत संगमनेर, नेवासा, शेवगाव आणि कोपरगाव या ५ जागा जवळपास बिनविरोध होण्याचे संकेत मिळाले आहेत. डॉक्टर सुजय विखे, रणजीत देशमुख, शंकरराव गडाख, चंद्रशेखर घुले पाटील आणि बिपीनदादा कोल्हे यांचे उमेदवारी अर्ज आहेत. मात्र, यावर अधिकृत शिक्कामोर्तब अर्ज माघारीनंतरच होणार आहे. दरम्यान, छाननीनंतर प्रमुख राजकीय नेत्यांचे अर्ज वैध ठरल्याने जिल्हा बँकेच्या निवडणुकीचे रणांगण सज्ज झाले असून अर्ज माघारीची २१ तारखेनंतरच निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.छाननीनंतर जिल्हा बँकेच्या १६ जागांसाठी २३९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत.

जिल्हा बँकेच्या २१ जागांसाठी ३६९ हून अधिक उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. मंगळवारी झालेल्या छाननीदरम्यान संगमनेर, राहाता आणि कोपरगावातील काही अर्जांवर सूचक-अनुमोदकांच्या सह्या बनावट असल्याचे आक्षेप घेण्यात आले. साखर कारखान्यांकडील थकबाकीच्या मुद्द्यावरून डॉ. सुजय विखे पाटील, आमदार मोनिका राजळे, राहुल व प्रणोती जगताप यांच्या अर्जांवरही हरकती घेण्यात आल्या. तसेच सहकारातील अनुभव नसल्याचा मुद्दा उपस्थित करत आमदार किरण लहामटे यांचा अर्ज बाद करण्याची मागणी वैभव पिचड यांनी केली होती. या सर्व हरकतींवर रात्री उशिरापर्यंत सुनावणी झाली. त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांनी हरकती फेटाळून वैध उमेदवारांची यादी जाहीर केली.

छाननीनंतर जिल्हा बँकेच्या १६ जागांसाठी २३९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत. सेवा सोसायटी मतदारसंघातील ११२ अर्जांपैकी ५३ अर्ज बाद झाल्याने ५९ उमेदवार शिल्लक आहेत. महिला राखीव मतदारसंघात ४४, इतर मागासवर्गीय मतदारसंघात ४१, बिगरशेती संस्था मतदारसंघात ३७, शेतीपूरक व प्रक्रिया-पणन मतदारसंघात २८, विमुक्त-भटक्या जमाती मतदारसंघात १८ आणि अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघात १२ उमेदवार वैध ठरले आहेत.

**'सहमती एक्स्प्रेस'ला वेग**

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांची 'सहमती एक्स्प्रेस' सध्या सुसाट सुटल्याचे चित्र आहे. उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतरच सोसायटी मतदारसंघातील ४ जागा बिनविरोध होण्याचे संकेत मिळाले आहेत. त्यामुळे माघारीच्या टप्प्यात आणखी कोणते राजकीय समझोते होतात, याकडे लक्ष लागले आहे.



**श्रीगोंद्यात सर्वाधिक चुरस**

श्रीगोंदा मतदारसंघात उमेदवारांची मोठी गर्दी असल्याने येथे राजकीय रस्सीखेच अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. राहुल कुंडलिकराव जगताप, राजेंद्र शिवाजीराव नागवडे, अर्चना दत्तात्रय पानसरे, दत्तात्रय भाऊसाहेब पानसरे, प्रणोती राहुल जगताप, आण्णासाहेब सिताराम शेलार, प्रतापसिंह बबनराव पाचपुते, सुधीर लक्ष्मण नलगे, अनुराधा कुंडलिकराव जगताप आणि संध्या महेश महांडुळे यांचे अर्ज वैध ठरले आहेत. अनेक राजकीय गटांचे हितसंबंध या मतदारसंघात गुंतले असल्याने माघारीत कोणती नवी समीकरणे आकार घेतात, याकडे जिल्ह्याचे लक्ष राहणार आहे.

**राहुरीत तनपुरे बंधू रिंगणात**

राहुरी मतदारसंघात प्राजक्त प्रसाद तनपुरे आणि हर्ष अरुण तनपुरे यांच्यासह सत्यजित चंद्रशेखर कदम यांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्यामुळे राहुरीच्या राजकीय पटावरही जिल्हा बँकेच्या निवडणुकीमुळे नवी समीकरणे तयार होण्याची शक्यता आहे.

**कर्जत-जामखेडमध्येही चुरस**

कर्जत मतदारसंघात तुषार आबादास पिसाळ, ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### वि. ल. कुलकर्णी शाळेचे निबंध स्पर्धेत यश



अहिल्यानगर- पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने गणेशोत्सवा निमित्त आयोजित निबंध स्पर्धेत वि.ल. कुलकर्णी प्राथ. शाळे तील इ. ७वी ची विद्यार्थिनी कु. ईशिका राहुल चिलका हिने तृतीय क्रमांक पटकावला. श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल नेप्ती नाका येथे संपन्न झालेल्या बक्षीस समारंभात महानगरपालिका आयुक्त श्री यशवंत डांगे याच्या हस्ते सन्मानचिन्ह , प्रमाणपत्र व फेटा बांधून तिला सन्मानित करण्यात आले. पर्यावरण पूरक गणेशोत्सव या विषयावर तिने निबंध लेखन करून पर्यावरणाच्या रक्षणातील आपली जबाबदारी स्पष्ट केली. तिच्या या यशासाठी संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी अध्यक्षा श्रीम. विजयाताई रेखे , उपाध्यक्ष श्री.चंद्रशेखर कुलकर्णी , सेक्रेटरी श्री किरण वैकर , खजिनदार श्री उमेश रेखे , कार्यकारिणी सदस्य श्री महेश रेखे , श्री उदयकुमार भणगे, श्री उमेश नगरकर शालेय समिती सदस्य श्री विठ्ठल धिमते , श्री हेमंत जोशी व श्रीमती पद्मजा बोर्डे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ भारदे व सर्व शिक्षकांनी शाळेच्या शिरपेचात नाव खोवल्या बद्दल तिचे अभिनंदन व कौतुक केले.

### प्रियदर्शनी पब्लिक स्कूलच्या माजी विद्यार्थिनी कु. तनुजा संभाजी खोमणे हिची उल्लेखनीय कामगिरी



अहिल्यानगर - प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज भिंगार, अहिल्यानगर या महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी कु. तनुजा खोमणे यांनी एम.एस.सी पदवी संपादन केल्यानंतर संशोधन क्षेत्रात पदार्पण केले. नुकतीच त्यांना पी.एच.डी पदवी प्राप्त झाली असून त्यांचा संशोधनाचा विषय असा असून, त्यांनी कृषी पिकांमध्ये संबंधित प्रजातीची विविधता व पर्यावरणीय अभ्यास या विषयावर सखोल संशोधन केले.त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब खोमणे, मुख्याध्यापक श्रीमती अंजली बोधक, उपमुख्याध्यापक अमोल घोरपडे व सर्व शिक्षक वर्ग यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### ॲड. साहिल समीर बोरा यांची जितो मुंबई क्वीन्स नेकलेस युवा अध्यक्षपदी निवड



अहिल्यानगर - अहिल्यानगरच्या मातीतून आपल्या कार्याची सुरुवात करून मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर मुंबईत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे ॲड. साहिल समीर बोरा यांची जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) मुंबई क्वीन्स नेकलेस युवा शाखेच्या अध्यक्षपदी २०२६२०२८ या कार्यकाळासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. अधिवक्ता, आयपीओ सल्लागार तसेच भारतीय जनता युवा मोर्चा, दक्षिण मुंबईचे सचिव म्हणून कार्यरत असलेल्या ॲड. बोरा यांच्यावर सोपविण्यात आलेल्या या जबाबदारीमुळे अहिल्यानगरच्या सामाजिक व युवा क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे. ॲड. साहिल बोरा हे अहिल्यानगरचे रहिवासी असून, त्यांचे वडील समीर बोरा हे देखील सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहेत. ते जैन ओसवाल पतसंस्थेचे विद्यमान संचालक तसेच जैन ओसवाल युवक संघाचे माजी अध्यक्ष आहेत. वडिलांच्या सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेत ॲड. साहिल बोरा यांनी कायदा, व्यवसाय, सामाजिक आणि युवा क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. अहिल्यानगरपासून सुरू झालेला त्यांचा मुंबईपर्यंतचा प्रवास हा केवळ शहर बदलण्याचा नसून, कर्तृत्वाच्या बळावर स्वतःची ओळख निर्माण करण्यासोबतच समाजासाठी योगदान देण्याचा आहे. युवकांना एकत्र आणणे, त्यांना विविध क्षेत्रांत संधी व व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि नव्या नेतृत्वाला प्रोत्साहन देणे, यावर ॲड. बोरा यांनी सातत्याने भर दिला आहे. कायदा व व्यावसायिक क्षेत्रातील कार्यासोबतच युवक आणि सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत जितो मुंबई क्वीन्स नेकलेस युवा शाखेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

## सोमवंशी क्षत्रिय कासार समाज,
## कासारे देवस्थान नवरात्र आणि यात्रा उत्सवाची जबाबदारी यंदा नेवासा तालुक्याकडे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** सोमवंशी क्षत्रिय कासार समाजाचे, कासारे देवस्थान, तालुका संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर येथे सालाबाद प्रमाणे आयोजित करण्यात येणाऱ्या श्री कालिकादेवी नवरात्रोत्सव व यात्रेच्या नियोजनासाठी जिल्ह्यातील विविध तालुक्यांना जबाबदारी देण्यात येते.

यावर्षी नवरात्र आणि यात्रा उत्सव या दोन्ही जबाबदाऱ्या मिळण्याचा मान नेवासा तालुक्यातील सोमवंशी क्षत्रिय कासार समाजाला मिळाला आहे. नेवासा तालुक्यातील कुकाना येथील प्रतिष्ठित व्यापारी श्रीधरशेठ कुंभकर्ण यांची अध्यक्ष पदासाठी निवड करण्यात आली तर नेवासा येथील व्यापारी योगेशशेठ रासने आणि सोनई येथील उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते संतोषशेठ कुंभकर्ण या दोघांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

नवरात्रोत्सव आणि यात्रा उत्सव च्या पार्श्वभूमीवर नुकतीच नेवासे येथील श्री मोहिनीराज मंदिर भक्तनिवास मध्ये कासार समाज बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली होती, या बैठकीत आगामी २०२६-२७ या वर्षासाठी नेवासा तालुक्याची निवड करण्यात येऊन, नवीन कार्यकारणी नियुक्त करण्यात आली.

अध्यक्षपदी श्रीधरशेठ कुंभकर्ण, उपाध्यक्षपदी योगेशशेठ रासने, आणि संतोषशेठ कुंभकर्ण, खजिनदारपदी अनंतशेठ रासने खामगाव, सचिव पदी गणेशशेठ विश्वंभर कुकाना, यासह सदस्य पदी मनोजशेठ हलचुते कुकाना, सल्लागार म्हणून उद्योजक किरणशेठ कुंभकर्ण नेवासा आणि उद्योजक अरुणशेठ रासने नेवासा फाटा या मान्यवरांची सर्वानुमते निवड करण्यात आली या निवडीबद्दल सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांचे अहिल्यानगर जिल्ह्यातून अभिनंदन होत आहे या बैठकीला कासारे देवस्थानचे विश्वस्त, निमंत्रित सदस्य आणि नेवासा तालुक्यातील कासार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित नवरात्रोत्सव आणि यात्रा उत्सव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## डिजिटल युगातील पिढीला घडले 'शिवतीर्थ रायगड'चे दर्शन

### अळकुटी साईनाथ हायस्कूलच्या एस.एस.सी. १९९८ माजी विद्यार्थ्यांचा उपक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** आजची नवी पिढी मोबाईल, व्हिडिओ गेम्स आणि डिजिटल जगतात हरवून जात असताना, त्यांना आपल्या गौरवशाली इतिहासाची प्रत्यक्ष अनुभूती देण्यासाठी अळकुटी येथील साईनाथ हायस्कूलच्या १९९८ एस एस सी. च्या माजी विद्यार्थ्यांनी एक कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मुलांसह थेट 'शिवतीर्थ रायगड' किल्ल्याची सफर करत नव्या पिढीला इतिहासाचा खरा वारसा दाखवला. या विशेष मोहिमेत एकूण ४० जणांचा समुह सहभागी झाला होता. मोबाईल युगात हरवलेली मुले बाहेर काढण्याचा सहलीचा मुख्य उद्देश नव्या पिढीला केवळ किल्ले दाखवणे हा नसून, त्यांच्या बालमनावर छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि शिवसंस्कार बिंबवणे हा होता.



२७०० फूट उंच असलेला रायगड पायथा पाचाड येथून पायऱ्यांनी सर करताना बालगायिक सुखदा थोरात हिने नमो शिवाजी राजा गायनातून मानवंदना देऊन, कड्या कपाऱ्यातून जाणारी रायगडाच्या वारीचा आनंद सर्वांनी घेतला. विविध फुलांनी बहरलेली फुललेला रायगड डोंगर परिसर मन मोहून टाकणारा होता. हिरकणी कडा अभेद्य असा गडाचा मुख्य आणि अत्यंत मजबूत प्रवेशद्वार महादरवाजा, राजसभा आणि सिंहासन, ऐतिहासिक वारसा लाभलेल्या शिवाजी महाराजांच्या शौर्याचे प्रतीक असलेल्या अवशेष, इतिहास डोळ्यांनी पाहताना, ऐकताना बॅचमधील सर्वजण भारावून गेले. क्षणभर महिला भगिनींच्या डोळ्यांत अश्रु तरळले. ऐतिहासिक वैशिष्ट्यपूर्ण बाजारपेठ टकमक टोक बघितले.

ऐतिहासिक जगदीश्वराच्या मंदिरात पडला सुरांचा पाऊस शिवरायांच्या स्वराज्याचे साक्षीदार असलेल्या जगदीश्वराच्या मंदिरात पवित्र वातावरणात बालगयिका सुखदा थोरात हिने ओम नमः शिवाय भावनिक सुगंधाने घातलेली गायनाची साद खरोखर मनाला स्पर्श जाणारी, मनाला विलक्षण निरव शांतता देणारा अनुभव आज रायगडावर अनेक शिवभक्तांनी घेतला. गायन काळात मंदिराचा परिसर, समाधी छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी स्थळ काही वेळ निरव शांततेने थबकला. भटकंती सोबतच शिवभक्त पर्यटकांना सांगितिक अनुभूती मिळाली. यासोबतच रायगडाचे अथांग नैसर्गिक सौंदर्य, उंच कडे आणि किल्ल्याची अभेद्य रचना पाहून नवी पिढी भारावून गेली. मेजर शिवाजी आवारी, मेजर दिलीप डेरे, आयटी वरीष्ठ अभियंता शिल्पा झावरे, फोटोग्राफर उमेश पुंडे यांनी ५० मिनिटात केलेली गतीमान गड चढाई करुन दिली महाराजांना आगळीवेगळी मानवंदना.

बालमनावर उमटले शिवसंस्कार मोबाईल स्क्रीनवर किल्ले पाहणाऱ्या मुलांनी जेव्हा प्रत्यक्ष रायगडाची माती कपाळाला लावली, छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी स्थळांचे दर्शन घेतल्यानंतर तेव्हा त्यांच्या डोळ्यात एक वेगळं चैतन्य, उत्साह पाहायला मिळाले. मनिष गोरे गाईडने मुलांना गडकिल्ल्यांचे महत्त्व आणि मराठ्यांच्या शौर्याचा इतिहास सोप्या भाषेत समजावून सांगितला. यामुळे मुलांच्या मनात इतिहास आणि संस्कृतीबद्दल प्रचंड आदर निर्माण झाला.

## नवरात्रोत्सवापूर्वी आ.अक्षय कर्डिले यांची पाहणी; खड्डे बुजवा, कचरा हटवा

### बेलेश्वर चौक ते बुऱ्हानगर, वारूळवाडीमार्गे संभाजीनगर महामार्गापर्यंत रस्त्याची पाहणी; भाविकांना त्रास होणार नाही यासाठी प्रशासनाला तातडीच्या सूचना



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तुळजाभवानीचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बुऱ्हानगर येथील नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी आमदार अक्षय कर्डिले यांनी बेलेश्वर चौक ते बुऱ्हानगर, वारूळवाडीमार्गे अहिल्यानगर-संभाजीनगर महामार्गापर्यंतच्या रस्त्याची पाहणी केली. रस्त्यावरील खड्डे, अस्वच्छता आणि रस्त्यालगत साचलेला कचरा याबाबत प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश त्यांनी दिले.बुऱ्हानगर देवस्थानात नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात असून, या काळात जिल्ह्यासह विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात.

त्यामुळे भाविकांच्या सुरक्षित आणि सुरळीत प्रवासासाठी रस्त्यांची दुरुस्ती, स्वच्छता आणि वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यावर कर्डिले यांनी भर दिला.पाहणीदरम्यान रस्त्यावरील खड्ड्यांचे तातडीने पॅचिंग करून आवश्यक त्या ठिकाणी डांबरीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच रस्त्याच्या दुतर्फा पडलेला कचरा तातडीने हटवून स्वच्छता मोहीम राबविण्याचे आदेशही प्रशासनाला देण्यात आले. नवरात्रोत्सवाच्या काळात भाविकांना रस्त्यामुळे कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना कर्डिले यांनी दिल्या.दरम्यान, रस्त्यालगत कचरा टाकणाऱ्या नागरिकांनाही त्यांनी आवाहन केले. कचरा रस्त्याच्या कडेला न टाकता प्रशासनाच्या कचरा संकलन वाहनातच टाकावा. वारंवार सूचना देऊनही रस्त्यालगत कचरा टाकला जात असल्यास संबंधितांवर तातडीने कारवाई करावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी स्थानिक प्रशासनाला दिल्या.नवरात्रोत्सवासाठी बुऱ्हानगरकडे येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता रस्ते, स्वच्छता आणि वाहतूक व्यवस्थेकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. त्यामुळे उत्सवापूर्वीच रस्त्यांवरील खड्डे आणि अस्वच्छतेचा प्रश्न मार्गी लावण्याच्या हालचालींना वेग आला आहे.



पाथर्डी पोलीस स्टेशन येथे नव्याने हजर झालेले नवनियुक्त पोलिस निरीक्षक श्री. नितिन कंडारे यांचा सत्कार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष अविनाश दादा पालवे, उपजिल्हाध्यक्ष देविदास हंडाळ, तालुकाध्यक्ष संतोषजी जिरेसाळ, उपतालुकाध्यक्ष एकनाथ सानप, शेतकरी सेना तालुकाध्यक्ष अंबादास शेळके, धनगरवाडीचे सरपंच अशोक गाडे, तोफिक शेख, अक्षय उराडे यांनी केला. यावेळी जिल्हाध्यक्ष अविनाश दादा पालवे यांनी तालुक्यामध्ये होत असलेले अवैध व्यवसाय, गुन्हेगारी याला थोपवून आपण जनतेचा विश्वास संपादन करावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

## शिक्षक आमदारांच्या हस्ते सेवानिवृत्त शिक्षक दाम्पत्याचा गौरव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी मंगळवारी (दि. ६) पैठण येथील 'जलरंग' निवासस्थानी सदिच्छा भेट देत शिक्षक व शैक्षणिक संस्थांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर शिक्षकांशी संवाद साधला.

यावेळी शिस्तप्रिय व कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका जलकन्या भानुदास गोरे तसेच मुख्याध्यापक बजरंग काळे यांच्या सेवानिवृत्तीबद्दल आणि शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

शिक्षक व शिक्षण संस्थांच्या विविध मागण्या आणि प्रलंबित प्रश्न शासन दरबारी मांडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याची ग्वाही आमदार काळे यांनी यावेळी शिक्षकांशी झालेल्या संवादात दिली. शिक्षकांच्या अडचणी, शैक्षणिक संस्थांचे प्रश्न तसेच भविष्यातील विविध शैक्षणिक उपक्रमांबाबतही यावेळी चर्चा झाली.

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष मनोज खुटे, प्रदीप विखे, अरुण गोर्डे, आत्माराम गोर्डे, दीपक नवथर, विशाल तिखे, सचिन तहकिक, ज्ञानेश्वर उभेदळ, परमेश्वर खरात, रमेश पवार, संजय गिरी, पत्रकार एकनाथ पा. काळे यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.

## महात्मा फुले माध्यमिक विद्यालय शाळेवर वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**भाळवणी –** वन्य प्राण्यांच्या साखळीत बिबट्याचे स्थान महत्त्वाचे आहे. मानव व बिबट्या किंवा वन्य प्राणी हा संघर्ष टाळून प्राणी जीवनाबद्दल जनजागृती निर्माण व्हावी, यासाठी पारनेर वनविभागाने वन्यजीव सप्ताह निमित्त जनजागृती केली. मा.वन परीक्षेत्र अधिकारी गजानन धाडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर वन विभागात भाळवणी या गावातील शाळांना भेटी देऊन विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधला.

यावेळी विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे साप व बिबट्याची जीवनशैली, बिबट्याची अन्न साखळी व त्याचे महत्त्व, मानव-बिबट्या संघर्षाची कारणे, संघर्षाचे परिणाम, संघर्ष टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना यासह बिबट्याच्या वावर क्षेत्रात घ्यावयाची खबरदारी? याची सखोल माहिती पारनेर वनविभागाच्या वतीने प्रमुख मार्गदर्शक श्री सुशांत मनवरे रा.पाथर्डी यांनी सापांच्या विविध प्रजातीचे खूप छान प्रकारे माहिती दिली. व त्याचबरोबर बिबट्याचे मुख्य खाद्य त्याच्या नजरेच्या पटीत म्हणजे शेळी, मेंढी, वासरू, कालवड, कुत्री, माकड, कोंबडी आदी आहे. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री नाईकवाडी सर व सर्व शिक्षक वृंद , तसेच वनपाल खराडे साहेब, वनरक्षक निलेश बडे, वनरक्षक भिमराव दवणे , किशोर गुंजाळ, महेश भागवत , दिगांबर विरोळे , दत्तू नऱ्हे, आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. आपल्या गावात जर कुठे बिबट्या बसलेला दिसला किंवा अडकलेला दिसला तर त्या ठिकाणी न जाता गोंधळ न घालता लगेच वनविभागास माहिती द्यावी, असे आवाहन अधिकार्यांनी केले.

## रामकृष्ण अर्बन च्या सभासदांना १५ टक्के लाभांश वाटपाचा शुभारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** रामकृष्ण अर्बन क्रेडिट सहकारी सोसायटीच्या ४१ वर्षाच्या कालावधीत सभासद व कर्जदारांना उत्तम व वेळेत सेवा देऊन राज्याला आदर्शवत ठरणारी कामगिरी रामकृष्ण ने केली आहे.कमी कर्मचारी संख्या असून देखील समाधानी ग्राहक व नेहमीच प्रगतीचाउ आर्थिक आलेख उंचावत असल्याने आजच्या कार्यक्रमाचे निमंत्रण हे आम्ही स्वतःचे भाग्य व सन्मान समजतो.असे मत लाभांश वाटप प्रसंगी उपस्थित सभासदांनी व्यक्त केले.

दरवर्षीप्रमाणे रामकृष्ण अर्बनच्या प्रातिनिधिक स्वरूपात निमंत्रित सभासदांना २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता १५ टक्के लाभांश वाटपाचा शुभारंभ करण्यात आला.याप्रसंगी रामकृष्ण अर्बन क्रेडिट सहकारी सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धूत,चेअरमन किसनलाल बंग,व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू, संचालक सर्वश्री राजेंद्र गुजराथी,सुधीर झालानी, लक्ष्मीकांत झंवर,ओमप्रकाश चांडक,मधुसूदन सारडा, विश्वनाथ कासट,अँड.अशोक बंग,अनुराग धूत,अनुरीता झगडे,देवराव साठे,साईनाथ कावट आदींसह संस्थेचे सभासद श्रीकांत काकाणी, श्रीनिवास सारडा,अँड.आर टी शर्मा, नरेश फिरोदिया,अनिल धोकरीया,सौ.भारती पटेल, देवेंद्र गांधी,रामनिवास झंवर, सौ.शोभा सोनी,मुकुंद जाजू, सौ.जागृती ओबेराय, ओमप्रकाश धूत,व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक, ओ.एस. डी. कुमार आपटे आदी उपस्थित होते.

संस्थेचे चेअरमन किसनलाल बंग यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.सभासदांचा भक्कम पाठिंबा,आजी-माजी संचालकांचे पाठबळ व संस्थेचे सर्व कर्मचारी यांचे उत्कृष्ट कार्य आणि श्रीगोपाल धूत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याने रामकृष्ण अर्बन ची दिवसेंदिवस प्रगती होत आहे. सभासदांचा संस्था व संचालक मंडळावर असलेला दृढ विश्वास यामुळे रामकृष्ण अर्बन पतसंस्थेची सातत्याने प्रगती होत आहे. संस्थेच्या कार्याचा नावलौकिक महाराष्ट्रात होत आहे.यंदाच्या वर्षी संस्थेला सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दोन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

संस्थेने आर्थिक प्रगती सोबत सामाजिक कार्यातही पुढाकार घेतला आहे.सभासदांचा हिताचा विचार करता संस्थेने निरंतर १५% लाभांश वाटप करण्याची परंपरा कायम ठेवली आहे.असे चेअरमन किसनलाल बंग यांनी सांगितले.

श्रीगोपाल धूत म्हणाले, सभासद हे संस्थेचे आधारस्तंभ आहेत.तसेच संस्थेचे सर्व संचालक मंडळ कुठलाही मिटींग भत्ता व मानधन न घेता विना मोबदला निस्वार्थ पणे संस्थेच्या हितासाठी अहोरात्र कार्य करीत आहेत.सभासदांचा भक्कम विश्वास व संचालक मंडळांचा पारदर्शी कारभार यामुळे संस्थेची प्रगती होत आहे. संस्थेच्या स्वनिधी ४२ कोटी रुपयांच्या वर असल्याने संस्था भक्कम अशा स्थितीमध्ये आहे.संस्थेच्या एकूण उत्पन्नापैकी पंधरा टक्के सभासदांना लाभांश वाटप,दहा टक्के समाजकार्य व दहा टक्के सभासदांच्या कल्याणासाठी तर उर्वरित नफ्याची संस्थेचा पाया भक्कम होण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

संस्थेविषयी अधिक माहिती देताना संचालक लक्ष्मीकांत झंवर म्हणाले, संस्थेचे संस्थापक श्रीगोपाल धूत यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची आर्थिक पायाभरणी झाली असल्याने संस्था दिवसेंदिवस प्रगती करित आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (✻ पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## सावेडी येथील समर्थ विद्यामंदिर प्रशालेत गाणी, गोष्टी आणि खेळातून घनकचरा व्यवस्थापनाचे विद्यार्थ्यांना धडे

### स्वच्छ परिसरासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने जबाबदारी स्वीकारावी – सुवर्णा वाघ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी येथील समर्थ विद्यामंदिर प्रशालेत विद्यार्थ्यांना गाणी, गोष्टी आणि विविध खेळांच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापनाची माहिती अत्यंत सोप्या व मनोरंजक पद्धतीने देण्यात आली. विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन कसे करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमादरम्यान ओला व सुका कचरा वेगळा करणे, कचऱ्याचा योग्य प्रकारे निपटारा करणे, पुनर्वापराचे महत्त्व तसेच घर, शाळा आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. गाणी, गोष्टी आणि खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आल्याने हा विषय विद्यार्थ्यांना सहज आणि आनंददायी पद्धतीने समजला.

यावेळी सुवर्णा वाघ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगितले. कचरा कुठेही न टाकता योग्य ठिकाणी टाकणे, ओला व सुका कचरा स्वतंत्र ठेवणे आणि पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा योग्य वापर करणे या छोट्या सवयींमधून परिसर स्वच्छ ठेवण्यास मोठी मदत होते. विद्यार्थ्यांनी स्वतः स्वच्छतेची सवय लावून घेतली तसेच आपल्या कुटुंबीयांमध्ये आणि परिसरातही स्वच्छतेचा संदेश पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध खेळ व उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. मनोरंजक पद्धतीने दिलेल्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना घनकचरा व्यवस्थापनाबरोबरच पर्यावरण संवर्धनाचे महत्त्वही समजले.

या उपक्रमासाठी संस्थेचे पदाधिकारी तसेच समर्थ विद्यामंदिर प्रशालेचे चेअरमन श्री. क्षीरसागर सर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर यांनीही मार्गदर्शन व सहकार्य केले. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची जाणीव निर्माण करून पर्यावरणपूरक सवयी रुजविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## विष्णू फुलसौंदर यांची जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड

### अमित कांबळे यांनी 'सर्टिफाईड इन्फॉर्मेशन सिस्टीम ऑडिटर' परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल शहर सहकारी बँकेच्या वतीने सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भिंगार अर्बन बँकेचे संचालक विष्णू फुलसौंदर यांची अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तसेच अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या आयटी विभागातील कनिष्ठ अधिकारी अमित कांबळे यांनी 'सर्टिफाईड इन्फॉर्मेशन सिस्टीम ऑडिटर' पदाची परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

बँकेचे चेअरमन सी.ए. गिरीश घैसास यांच्या हस्ते दोघांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बँकेचे व्हाईस चेअरमन प्रा. माणिक विधाते, ज्येष्ठ संचालक सुभाष गुंदेचा, संचालक अशोक कानडे, संजय घुले, निखिल नहार, डॉ. भूषण अनभुले, प्रदीपकुमार जाधव, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे, सेवक प्रतिनिधी संतोष मखरे आदी उपस्थित होते.

यावेळी चेअरमन सी.ए. गिरीश घैसास म्हणाले की, अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या माध्यमातून जिल्ह्यातील सहकारी बँकांचे विविध प्रश्न मांडण्याचे काम केले जाते. भिंगार अर्बन बँकेचे संचालक विष्णू फुलसौंदर यांची असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड झाली असून, त्यांच्या माध्यमातून सहकारी बँकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील.

अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या आयटी विभागातील कनिष्ठ अधिकारी अमित कांबळे यांनी 'सर्टिफाईड इन्फॉर्मेशन सिस्टीम ऑडिटर' पदाची परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल बँकेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. बँकिंग क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढत असताना सायबर गुन्ह्यांचे आव्हानही वाढत आहे. अमित कांबळे यांच्या ज्ञानाचा व कौशल्याचा बँकेला लाभ होऊन सायबर क्राईमचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल, असे सी.ए. गिरीश घैसास यांनी सांगितले.

## केडगावात १५ वर्षांखालील बास्केटबॉल खेळाडूंची जिल्हास्तरीय निवड चाचणी उत्साहात

### संभाजी कदम बास्केटबॉल अकॅडमीच्या लीग स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंचा मोठा सहभाग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तळागाळातील बास्केटबॉल खेळाला चालना देऊन गुणवंत खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संभाजी कदम बास्केटबॉल अकॅडमी, पुणे यांच्या वतीने आयोजित १५ वर्षांखालील मुला-मुलींच्या लीग स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याची निवड चाचणी केडगाव येथील ऊर्जा गुरुकुल शाळेच्या मैदानावर उत्साहात पार पडली. या निवड चाचणीचे आयोजन केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने करण्यात आले.

या निवड चाचणीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध बास्केटबॉल क्लबमधील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग घेत आपले कौशल्य सादर केले. केडगाव स्पोर्ट्स अकॅडमी, पोलीस बॉईज बास्केटबॉल क्लब अहिल्यानगर, एबीसी बास्केटबॉल क्लब अहिल्यानगर, बॉलर्स अकॅडमी अहिल्यानगर, एसबीसी सावेडी-अहिल्यानगर तसेच एसबीसी श्रीरामपूर या संघांतील खेळाडूंनी निवड चाचणीत सहभाग घेतला.



निवड चाचणीदरम्यान खेळाडूंची बास्केटबॉल खेळाशी संबंधित शारीरिक क्षमता, फिटनेस, मूलभूत बास्केटबॉल कौशल्ये तसेच प्रत्यक्ष सामन्यातील खेळाचे निरीक्षण करून त्यांची गुणवत्ता तपासण्यात आली. या विविध निकषांच्या आधारे उत्कृष्ट खेळाडूंची मुख्य लीग स्पर्धेसाठी निवड करण्यात येणार आहे.

या निवड प्रक्रियेसाठी संभाजी कदम अकॅडमीचे संचालक शरद नागणे सर, उत्तेकर सर, धनंजय नाखले, गणेश नागणे सर तसेच इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स सायन्स अँड टेक्नॉलॉजी, पुणे येथील तज्ज्ञ टीम उपस्थित होती. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंच्या कौशल्याची बारकाईने पाहणी करण्यात आली.

निवड झालेल्या खेळाडूंचे स्वतंत्र संघ तयार करून त्यांचे नियोजनबद्ध सराव सत्र घेण्यात येणार आहे. या सरावादरम्यान अनुभवी व उत्कृष्ट प्रशिक्षकांचे मार्गदर्शन खेळाडूंना मिळणार असून, भारतीय बास्केटबॉल खेळाडू व प्रशिक्षक संभाजी कदम सर यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभणार आहे. त्यामुळे या निवड प्रक्रियेमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील होतकरू बास्केटबॉल खेळाडूंना आपले कौशल्य विकसित करण्याची आणि मोठ्या व्यासपीठावर खेळण्याची संधी मिळणार आहे.

या निवड चाचणीच्या यशस्वी आयोजनासाठी केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर, सचिव सुभाष नवले, प्रशिक्षक छबुराव कोतकर सर व स्वाती बारहाते यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी ऊर्जा गुरुकुलच्या संचालिका कल्याणी फिरोदिया, चंद्रशेखर मस्के, ओमसिंग बायस, राष्ट्रीय खेळाडू सचिन अग्रवाल, सत्यम देवळालीकर, मुस्ताक शेख, ॲड. हर्षल शेलोत, सचिन जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. निवड झालेल्या खेळाडूंना पुणे येथे होणाऱ्या मुख्य लीग स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

## हिंद सेवा मंडळाच्या कारभाराबाबत गंभीर तक्रारी; शिक्षण विभागाच्या पत्रव्यवहारासह विविध अनियमिततांची चौकशी करण्याची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील सुमारे १०० वर्षांचा इतिहास असलेल्या हिंद सेवा मंडळ शैक्षणिक संस्था, (संस्था नोंदणी क्रमांक एफ-९) या संस्थेच्या गैरकारभाराबाबत गेल्या काही वर्षांत अत्यंत गंभीर, नियमबाह्य व कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात शिक्षण खात्याकडून झालेला पत्रव्यवहार, चौकशी व विविध कागदपत्रे संस्थेच्या सर्व सभासदांना, शिक्षण क्षेत्रातील जाणकारांना, संस्था कर्मचाऱ्यांना, विद्यार्थ्यांना तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील सुज्ञ नागरिकांना माहिती व्हावी, या उद्देशाने पत्रकार बांधवांकडे पाठविण्यात येत असल्याचे संस्थेचे आजीव सभासद व माजी पदाधिकारी राजेंद्र कांतीलाल चोपडा, रा. सत्ता कॉलनी, अहिल्यानगर आणि सुनील भगवान रामदासी, रा. विवेकानंद चौक, गुजर गल्ली, अहिल्यानगर यांनी म्हटले आहे.

चोपडा व रामदासी यांनी म्हटले आहे की, आम्ही दोघेही संस्थेचे आजीव सभासद असून अनेक वर्षांपूर्वी संस्थेच्या विविध पदांवर कार्यरत राहून शिक्षण क्षेत्रात काम केले आहे. मात्र, गेल्या सात-आठ वर्षांत शिक्षण क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाले असताना कायद्यातील व नियमांतील तरतुदींचा आवश्यक अभ्यास न करता संस्थेचे तत्कालीन सचिव श्री. संजयजी जोशी, सहसचिव श्री. योगेश देशमुख, जे अकोले येथे वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत आहेत, तसेच काही संचालकांनी संस्थेचा कारभार केल्याचा आमचा आरोप आहे. या कारभारासंदर्भात आम्ही सातत्याने अभ्यासपूर्वक माहिती संकलित करून संबंधित शिक्षण विभागाकडे व शासनाच्या विविध स्तरांवर लेखी पत्रव्यवहार केला आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संस्थेचे धर्मादाय आयुक्त कार्यालयातील चेंज रिपोर्ट वेळेत दाखल करण्यात आले नाहीत. संस्थेची सध्याची घटना व त्याअनुषंगाने संस्थेच्या कारभाराची कायदेशीर स्थिती याबाबतही प्रश्न निर्माण झाले आहेत. उपलब्ध माहितीनुसार काही चेंज रिपोर्टबाबत प्रतिकूल निर्णय झाल्याचे आमच्या निदर्शनास आले असून, त्याची अधिकृत व प्रमाणित स्थिती सर्व सभासदांसमोर स्पष्ट करण्यात यावी, अशी आमची मागणी आहे. तसेच संस्थेमध्ये शिक्षण विभागाची आवश्यक मान्यता न घेता भरती झाल्याचा, नियमबाह्य पदोन्नती देण्यात आल्याचा तसेच शिक्षकांवर दबाव टाकून विविध ठिकाणी बदल्या करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. शिक्षकांची सेवा-ज्येष्ठता यादी नियमाप्रमाणे व संस्थास्तरावर तयार करून उपलब्ध करून देणे आवश्यक असताना ती योग्य पद्धतीने तयार करण्यात आली नाही किंवा वेळोवेळी त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले, असा आमचा आरोप आहे. त्यामुळे पदोन्नती, नियुक्त्या, बदल्या आणि इतर प्रशासकीय निर्णय मनमानी पद्धतीने झाले का, याची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे.

संस्थेच्या विविध बांधकामांबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून आवश्यक त्या परवानग्या घेण्यात आल्या आहेत का, याची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे संस्थेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये विविध प्रकारच्या अनियमितता अथवा आर्थिक गैरव्यवहार झाले आहेत का, याची स्वतंत्र लेखापरीक्षणाद्वारे तपासणी करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

संस्थेच्या श्रीरामपूर येथील शाळांमध्ये, विशेषतः दादा वामन जोशी विद्यालय आणि भी. रा. खटोड विद्यालयाशी संबंधित विविध प्रकरणे चर्चेत आली असून, त्यामध्ये कथित 'खिचडी प्रकरणा'चाही समावेश आहे. या सर्व बाबींची वस्तुनिष्ठ चौकशी होणे आवश्यक असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. संस्थेचे अहिल्यानगर येथील कार्यालय सर्डा कॅन्टीनच्या शेजारी आहे. संस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकींमध्ये शैक्षणिक विषय, शाळांची गुणवत्ता, विद्यार्थ्यांचे प्रश्न, शिक्षकांचे प्रश्न आणि संस्थेच्या भविष्यातील शैक्षणिक नियोजनाला अपेक्षित प्राधान्य मिळते का, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. बैठकीच्या वेळी नाश्ता, जेवण किंवा इतर आदरातिथ्याला अधिक महत्त्व दिले जाते आणि संस्थेचे कार्यालय शैक्षणिक कामकाजाच्या केंद्रापेक्षा गप्पागोष्टींचे ठिकाण बनल्याचे वातावरण दिसून येते, असा आरोप तक्रारदारांनी केला आहे. संस्थेच्या मालमत्तेबाबतही गंभीर प्रश्न निर्माण झाले असून त्याची स्वतंत्र तपासणी व्हावी, अशी मागणी आहे.

मध्यंतरी संस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर नवीन सभासद करण्यात आल्याचे तक्रारदारांचे म्हणणे असून, सुमारे साडेतीनशे नवीन सभासदांची नोंदणी करण्यात आली असल्याचा दावा करण्यात आला आहे. काही संचालकांना मोठ्या प्रमाणात सभासद करण्यासाठी कथित कोटा देण्यात आला आणि त्याद्वारे भविष्यात संस्थेवरील नियंत्रण कायम ठेवण्याची आखणी करण्यात आली, असा आरोपही करण्यात आला आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून या सर्व सभासद अर्जांची, सभासद नोंदणीची, फी व पावत्यांची आणि संबंधित रजिस्टरची स्वतंत्र पडताळणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या सभासदांकडून प्राप्त झालेली फी संस्थेच्या ऑडिट रिपोर्टमध्ये दाखविण्यात आली नाही किंवा ती जमा झालेली नाही, असा आरोप करण्यात आला असून, आम्ही याबाबत लेखी पत्र देऊन निदर्शनास आणून दिल्यानंतर 'नजरचुकीने राहिले' असे स्पष्टीकरण देण्यात आल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

विशेषतः श्रीरामपूर व अकोले येथील सेवक वर्गाकडून दर महिन्याला सक्तीची 'आर्थिक कपात' केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अहिल्यानगरमध्येही अशा प्रकारची कपात केली जाते का, याची तपासणी करावी, अशी मागणी आहे. अशा कपातीसाठी संस्थेला कायदेशीर अधिकार आहे का, याबाबत शिक्षण विभागाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणांकडे संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला असून, अधिकाऱ्यांची भूमिका व संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया यांचीही स्वतंत्र चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

चोपडा व रामदासी यांनी सांगितले की, आम्ही या सर्व बाबींकडे अभ्यासपूर्वक लक्ष दिल्यानंतर गेल्या आठ-दहा महिन्यांपासून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, शिक्षण आयुक्त, शिक्षण सचिव, शिक्षण संचालक, पुणे, शिक्षण उपसंचालक, पुणे तसेच जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने लेखी पत्रव्यवहार केला आहे. आम्हाला उपलब्ध असलेली माहिती, कागदपत्रे व तक्रारी लेखी स्वरूपात साद केल्यानंतर काही बाबींमध्ये चौकशा सुरू झाल्या असून, त्या चौकशीदरम्यान काही गंभीर प्रशासकीय बाबी समोर आल्याचे आमचे म्हणणे आहे.शिक्षकांनी आपला महत्त्वाचा वेळ विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी, त्यांचे शैक्षणिक व सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी दिला पाहिजे आणि संस्थाचालकांनीही त्याच विषयाला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे, असे तक्रारदारांनी म्हटले आहे. मात्र संस्थेच्या कामकाजात प्रसिद्धी, वर्तमानपत्रांतील बातम्या, फोटो, सत्कार, कार्यक्रम आणि इतर बाबींना जास्त महत्त्व दिले जात असल्याचे दिसते, तर विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढविणे, खेळ, गुणवत्ता आणि शैक्षणिक सुविधा याकडे अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. विशेषतः सारडा कॉलेजसारख्या संस्थेत खेळ बंद झाले होते; आम्ही पत्रव्यवहार केल्यानंतर गेल्या एक-दोन महिन्यांत तेथे एक-दोन खेळ पुन्हा सुरू झाल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

सारडा कॉलेजच्या प्राचार्य गावित मॅडम यांच्या कार्यकाळातील एका प्रकरणाचाही तक्रारदारांनी उल्लेख केला आहे. एका नापास विद्यार्थ्याला पास असल्याचा दाखला देण्यात आल्याची आम्ही तक्रार केल्यानंतर, संबंधितांकडून लेखी उत्तर देऊन ही चूक 'नजरचुकीने' झाल्याचे सांगण्यात आले आणि त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यात आली, असा दावा तक्रारदारांनी केला आहे. ही बाब गंभीर असून, संबंधित शैक्षणिक नोंदींची स्वतंत्र तपासणी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

संस्थेच्या प्रशासकीय कामकाजामध्ये मोठ्या प्रमाणात गोंधळ असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सिताराम सारडा हायस्कूलसारख्या ठिकाणी शालेय परिसरात विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या मारामारीत एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची बाब तक्रारी व उपलब्ध माहितीनुसार समोर आली होती, असे तक्रारदारांनी म्हटले असून, या घटनेच्या अधिकृत नोंदी व त्यानंतर करण्यात आलेल्या उपाययोजनांची तपासणी करावी, अशी मागणी केली आहे. त्याचप्रमाणे अकोले येथे सहसचिव श्री. योगेश देशमुख यांच्यावर २०२३ मध्ये एका महिला शिक्षिकेबाबत विनयभंगाचा गुन्हा दाखल झाल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. या प्रकरणाची अधिकृत पोलीस नोंद व त्याची सद्यस्थिती संबंधित यंत्रणांनी स्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

श्रीरामपूर येथेही विद्यार्थिनींच्या लैंगिक सुरक्षेशी संबंधित गंभीर तक्रारी व गुन्ह्यांच्या बाबी समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे. एका शिक्षकाविरुद्ध अल्पवयीन मुलींशी संबंधित लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात पॉक्सो कायद्यांतर्गत कारवाई झाल्याचे तक्रारदारांनी म्हटले असून, या संदर्भातील अधिकृत पोलीस व न्यायालयीन नोंदी तपासाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ स्थानिक आमदार हेमंत ओगले यांनी मोर्चा काढल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच श्रीरामपूर येथील आणखी एका प्रकरणात अवधूत कुलकर्णी यांच्याविरुद्धही अशा स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद झाल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. या सर्व बाबी अत्यंत गंभीर असल्याने संस्थेच्या पातळीवर बालसुरक्षा, लैंगिक छळ प्रतिबंधक यंत्रणा आणि संबंधित कायदेशीर समित्यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही केली होती का, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या सर्व तक्रारी व शिक्षण विभागाकडे झालेल्या पत्रव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर संस्थेतील काही शाळांच्या पातळीवर चौकशी करून आवश्यक असल्यास प्रशासक नियुक्तीबाबत कार्यवाही करण्याची शिफारस शिक्षण विभागाच्या स्तरावर करण्यात आल्याचे तक्रारदारांनी सांगितले आहे. त्यामुळे संस्थेमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात तक्रारी व प्रशासकीय प्रश्न निर्माण होत असताना त्याकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

आमच्या सातत्यपूर्ण पत्रव्यवहारानंतर संस्थेचे तत्कालीन सचिव श्री. संजयजी जोशी यांनी राजीनामा दिला असून त्यांच्या जागी श्री. सुमतीलाल कोठारी यांची सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री. मोडक सर यांच्या दुःखद निधनानंतर ॲड. अनंत फडणीस यांची अध्यक्ष म्हणून आणि श्री. अनंत देसाई यांची कार्याध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे. मात्र, या नियुक्त्यांना संस्थेच्या घटनेत स्पष्ट तरतूद आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला असून, संबंधित नियुक्त्यांचा कायदेशीर आधार सर्व सभासदांसमोर स्पष्ट करण्यात यावा, अशी मागणी आहे. या नव्या पदाधिकाऱ्यांकडून मात्र आम्हाला प्रामाणिक अपेक्षा आहे की, संस्थेमध्ये यापूर्वी झालेला कथित नियमबाह्य व अनियमित कारभार थांबवून संस्थेचे कामकाज नियमांनुसार, पारदर्शक पद्धतीने आणि शिक्षणाच्या गुणवत्तेला प्राधान्य देऊन चालविण्यात येईल, असे तक्रारदारांनी म्हटले आहे.

संस्थेमध्ये आतापर्यंत लाखो रुपयांचे आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे आरोप असून, काही नियुक्त्यांशी संबंधित आर्थिक व्यवहारांबाबतही चर्चा असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. मात्र या सर्व आरोपांची सत्यता स्वतंत्र लेखापरीक्षण व अधिकृत चौकशीद्वारेच स्पष्ट होऊ शकते, त्यामुळे संस्थेच्या आर्थिक व्यवहारांचे विशेष ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. संस्थेचे महत्त्वाचे कागदपत्रे, पत्रव्यवहार आणि इतर रेकॉर्ड एका व्यक्तीकडे खासगी ठिकाणी ठेवले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सदर सर्व कागदपत्रे संस्थेच्या कार्यालयात आणून ठेवावीत, यासाठी आम्ही वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे. मात्र आजपर्यंत सर्व कागदपत्रे संस्थेच्या कार्यालयात आणण्यात आली आहेत किंवा नाहीत, याचा लेखी खुलासा संस्थाचालकांनी करावा, अशी आमची मागणी आहे.

संस्थेचे सर्व रेकॉर्ड, सभासदांचे अर्ज, सभासद नोंदणी पुस्तके, रजिस्टर, पावती पुस्तके, ऑडिट रिपोर्ट, शिक्षण विभागाशी झालेला पत्रव्यवहार आणि संस्थेच्या प्रशासकीय निर्णयांशी संबंधित सर्व कागदपत्रे संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र प्रत्यक्षात या सर्व नोंदी पारदर्शकपणे उपलब्ध आहेत का, याबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रत्येक संचालकाने संस्थेच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाचा अभ्यास करून जबाबदारीने भूमिका घेणे अपेक्षित असताना, केवळ बैठकीला उपस्थित राहणे, प्रसिद्धी मिळविणे, फोटो काढणे, राजकीय व्यक्तींना कार्यक्रमांना बोलावणे आणि त्याची प्रसिद्धी करणे यापेक्षा विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी ठोस काम होणे आवश्यक आहे, असे तक्रारदारांनी स्पष्ट केले आहे.

या संपूर्ण प्रकरणात कोणत्याही व्यक्तीविरुद्ध वैयक्तिक द्वेष किंवा राजकीय हेतू नसून, संस्थेचे हित, शिक्षकांचे हित, विद्यार्थ्यांचे हित आणि शिक्षण क्षेत्रातील पारदर्शकता या उद्देशाने आम्ही सातत्याने पत्रव्यवहार करीत आहोत, असे राजेंद्र कांतीलाल चोपडा व सुनील भगवान रामदासी यांनी म्हटले आहे. शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून आम्हाला प्राप्त झालेले विविध पत्रव्यवहार व कागदपत्रे यासोबत जोडत असून, त्यामधून संबंधित बाबींची अधिकृत पडताळणी होऊ शकते. त्यामुळे हिंद सेवा मंडळ शैक्षणिक संस्थेच्या कारभाराबाबत शिक्षण क्षेत्रामध्ये निर्माण झालेल्या या प्रश्नांना आपल्या वर्तमानपत्राच्या माध्यमातून विशेष प्रसिद्धी देण्यात यावी, संबंधित कागदपत्रांची वस्तुनिष्ठ पडताळणी करण्यात यावी आणि संस्थेच्या हितासाठी, शिक्षण क्षेत्राच्या हितासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष व सखोल चौकशी करण्याची मागणी शासन व शिक्षण विभागाकडे करण्यात यावी, अशी नम्र विनंती आम्ही पत्रकार बांधवांकडे करीत आहोत.

**राजेंद्र कांतीलाल चोपडा**
आजीव सभासद व माजी पदाधिकारी,
हिंद सेवा मंडळ शैक्षणिक संस्था
रा. सत्ता कॉलनी, अहिल्यानगर

**सुनील भगवान रामदासी**
आजीव सभासद व माजी पदाधिकारी,
हिंद सेवा मंडळ शैक्षणिक संस्था
रा. स्वामी विवेकानंद चौक,
गुजर गल्ली, अहिल्यानगर

आनंद तीर्थ समवशरण येथे अहिल्येच्या लेकींना मिळाला नवीन वाटा निर्माण करण्याचा दृष्टिकोन

# घराचे घरपण टिकवून संस्कार, संस्कृतीची ज्योत प्रज्वलित करा - पूज्य प्रविणऋषीजी महाराज

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या आजच्या काळातील लेकी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. आपल्या स्वप्नांना साकार करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करत आहेत. हे अतिशय चांगले असले तरी अहिल्यादेवींप्रमाणे गडद अंधारात ज्योत बनून परिवार, समाज, देशासाठी योगदान देण्यासाठी महिलांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. इतरांना मार्गदर्शक ठरतील अशा वाटा निर्माण केल्या पाहिजेत. राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होण्याचा संकल्प करा असा संदेश मंगळवारी आनंद तीर्थ समवशरण येथे उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांनी अहिल्यानगरमधील स्त्री शक्तीला दिला.

आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासांतर्गत 'अहिल्येच्या लेकी' हा विशेष कार्यक्रम मंगळवारी घेण्यात आला. समर्पण चातुर्मास कमिटी, अर्हम् विज्जा फौडेशन आयोजित या कार्यक्रमास नगरमधील सर्वधर्मीय युवती, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

याप्रसंगी समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटी सदस्य यांच्यासह अर्हम् विज्जा फाऊंडेशनच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा सुनिता छजलानी (इंदोर), नगरसेविका मिनाताई चोपडा, अनिता शेटिया, डॉ. सुधा कांकरिया, अलका मुंदडा, डॉ. रेणुका पाठक, प्राचार्या गिता गिल्डा, श्वेता गांधी, सपना असावा, वैशाली चोपडा, योगिता चंगेडिया ,रूपाली मुनोत, सुमंगला मुनोत, मेरू कर्नावट, समता बोरा, सागर पवार आदी उपस्थित होते. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती आणि अहिल्यानगरचे सुपुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराजजी बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराजजी बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

पूज्य प्रविणऋषीजी महाराज म्हणाले, नावात काय असते? असे म्हणतात. पण नावातच सर्व काही असते. शहराच्या, गावाच्या, देशाच्या नावात एक इतिहास असतो. श्रद्धा, शक्ती असते. नगरचे अहिल्यानगर नामकरण झाल्यानंतर माझा पहिला चातुर्मास येथे होत आहे. प्रत्येकीने आता या नावाच्या शक्तीशी स्वतःला जोडायचे आहे. कारण ही शक्ती कुठेतरी हरवली आहे. नगरच्या भूमीत जन्मलेली एक कन्या सुन म्हणून अनोळखी प्रांतात जाऊन इतिहास घडवते. तिच्या स्पर्शाने संपूर्ण भारतात आपली संस्कृती पुनरुज्जीवित झाली. गडद अंधारात त्यांनी उजेड शोधला नाही तर त्या स्वतःच ज्योत बनल्या.

# दर्जेदार आरोग्य सेवेमुळे रेणुका हॉस्पिटल शेवगावकरांच्या विश्वासास पात्र

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आई होण्याचा प्रवास हा प्रत्येक महिलेच्या आयुष्यातील अत्यंत संवेदनशील आणि आनंदाचा टप्पा असतो. या प्रवासात योग्य वेळी वैद्यकीय सल्ला, आवश्यक तपासण्या, सुरक्षित प्रसूती आणि नवजात बाळाच्या आरोग्याची काळजी घेण्याला विशेष महत्त्व असते. पूर्वी प्रसूतीसाठी शेवगाव परिसरातील म हिलांना अहिल्यानगर किंवा छत्रपती संभाजीनगर यांसारख्या लांबच्या शहरांमध्ये धाव घ्यावी लागत होती. मात्र, गेल्या नऊ वर्षांत स्थानिक पातळीवर उपलब्ध झालेल्या दर्जे दार आरोग्यसेवेमुळे महिलांचा हा प्रवास अधिक सुलभ आणि सुरक्षित झाला आहे. डॉ. संदीप येन्डे आणि डॉ. सीमा येन्डे यांच्या मार्गदर्शनाखाली रेणुका हॉस्पिटलने गेल्या नऊ वर्षांत स्त्रीरोग व प्रसूती सेवा, बालरोग सेवा, नवजात अतिदक्षता विभाग (एनआयसीयू), दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा अशा विविध आधुनिक सुविधा विकसित केल्या आहेत. रुग्णाच्या वैद्यकीय स्थितीनुसार उपचाराचे योग्य नियोजन, आवश्यक तपासण्या आणि



अचूक वैद्यकीय मार्गदर्शन यावर येथे भर दिला जातो. नऊ वर्षांपूर्वी शेवगावमध्ये प्रसूतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा सहज उपलब्ध नसल्यामुळे गर्भवती महिलांना मोठा प्रवास करावा लागत असे. त्यातून कुटुंबीयांची धावपळ, वेळेचा अपव्यय आणि आपत्कालीन परिस्थितीत निर्माण होणारी चिंता या समस्या निर्माण होत असत. ही गरज लक्षात घेऊन रेणुका हॉस्पिटलने आपली वैद्यकीय सेवा विस्तारली आहे. माता आणि बाळाची सुरक्षितता केंद्रस्थानी ठेवून प्रसूतीचे नियोजन केले जाते. प्रत्येक गर्भवती महिलेची वैद्यकीय परिस्थिती वेगळी असल्याने तपासण्यांचे निष्कर्ष, गर्भावस्थेची स्थिती आणि डॉक्टरांचा सल्ला यानुसार प्रसूतीची पद्धत निश्चित केली जाते. वैद्यकीयदृष्ट्या योग्य परिस्थिती असल्यास प्राधान्याने नैसर्गिक प्रसूतीवर (नॉर्मल डिलिव्हरी) भर दिला जातो. प्रसूतीपूर्व काळजीपासून प्रसूतीनंतरच्या काळातील माता व नवजात बाळाच्या निगेपर्यंत सर्व आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले जाते.

रेणुका हॉस्पिटलची २४ तासतातडीची सेवा ही शेवगाव आणि परिसरातील रुग्णांसाठी अत्यंत म हत्त्वाची सुविधा ठरली आहे. विशेषतः प्रसूती किंवा बालरोगाशी संबंधित प्रसंगी तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध होत असल्याने बाहेरील शहरांकडे जाण्याची गरज कमी झाली आहे. रुग्णसेवेचा विस्तार आणि भविष्यातील वाढत्या गरजा लक्षात घेऊन रेणुका हॉस्पिटलच्या नव्या भव्य इमारतीचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. अधिक प्रशस्त जागा, स्वच्छ व आरोग्यपूरक वातावरण आणि आधुनिक वैद्यकीय सुविधांचा विस्तार करण्याच्या दृष्टीने या नव्या इमारतीची उभारणी होत आहे. ही नवी वास्तू सेवेत दाखल झाल्यानंतर परिसरातील रुग्णांना अधिक उत्तम सुविधा उपलब्ध होणार असून, नऊ वर्षांचा विश्वास जपत रेणुका हॉस्पिटलची आता आरोग्यसेवेच्या नव्या पर्वाकडे वाटचाल सुरू आहे.

# सायबर फसवणुकीमध्ये सावधगिरी हाच मोठा बचाव

**सायबर सेलचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांचे प्रतिपादन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** इतर गुन्ह्यांपेक्षा सायबर गुन्हे संपूर्णपणे वेगळे आहेत. सायबर फसवणुकीमध्ये सावधगिरी बाळगणे हाच मोठा बचाव असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल सायबर क्राईम ब्रँच पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात संपूर्ण ऑक्टोबर महिन्यात सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने रेल्वे स्टेशन भागातील संजीवनी कॉलनीत जेष्ठ नागरिकांसाठी आयोजित सायबर सुरक्षितता जनजागृती कार्यक्रमात श्री ढिकले यांनी जेष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले.

श्री ढिकले पुढे म्हणाले की, जगात कोणतीही गोष्ट फुकट आणि स्वस्त मिळत नाही. त्यामुळे सोशल मीडियावरील जाहिरातींच्या प्रलोभनांना नागरिकांनी बळी पडू नये. सायबर फसवणुकीमध्ये प्रामुख्याने डिजिटल अरेस्ट, डिजिटल मार्केटिंगचे अमिष, मोठ्या परताव्याच्या आमिषाने शेअर मार्केटिंगमध्ये गुंतवणुक हे तीन प्रकार निदर्शनास येतात. यामध्ये फसवणूक झालेल्या नागरिकांपैकी ६०% लोक हे ज्येष्ठ नागरिक आहेत.त्यामुळे सायबर फसवणुकीपासून बचावासाठी ज्येष्ठ नागरिकांनी विशेष सतर्क रहावे असे आवाहन श्री ढिकले यांनी यावेळी केले.

सायबर गुन्हेगारांकडे विविध मार्गांनी डेटा जमा झालेला असतो. ज्येष्ठ नागरिकांना सहज विश्वासात घेऊन फसवणूक करणे सोपे असते ही बाब सायबर गुन्हेगारांना लक्षात आलेली आहे.

ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करताना सायबर गुन्हेगारांकडून वेगवेगळ्या संकल्पना वापरण्यात येतात. गंभीर गुन्ह्यात सहभाग आढळला आहे अशी भीती घालून डिजिटल अरेस्टचा बनाव केला जातो. त्या माध्यमातून तातडीची स्थिती निर्माण केली जाते. कारवाईची भीती घातली जाते. आणि शेवटी संबंधितांकडून मोठ्या रकमा उकळल्या जातात.याचबरोबर मोठ्या परताव्याच्या अमिषाने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक तसेच डिजिटल मार्केटिंगच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात नफ्याची लालूच दाखवली जाते व त्या माध्यमातून देखील जेष्ठ नागरिकांची आर्थिक फसवणूक होत आहे.

त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी सोशल मीडिया हाताळताना अतिशय सतर्क रहावे.

सायबर गुन्हेगारांकडून फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या क्रमांकावर संपर्क साधून तात्काळ आपली तक्रार नोंदवावी तसेच आपल्या जवळच्या नातेवाईकांना सत्य घटना सांगून तातडीने उपाययोजना करावी असे आवाहन श्री ढिकले यांनी यावेळी उपस्थितांना केले.

डिजिटल अरेस्ट असा कोणताही प्रकार अस्तित्वात नाही. ही फसवणुकीची पूर्णपणे काल्पनिक संकल्पना आहे. अशा प्रकारांना नागरिकांनी अजिबात घाबरू नये व बळी पडू नये. याचबरोबर आपले पर्सनल डिटेल्स, ओटीपी, संशयास्पद अनोळखी लिंक्स, एपीके फाइल्स इत्यादींबाबत सतर्कता बाळगावी. याचबरोबर सोशल मीडियावरील जाहिरातींच्या प्रलोभनांना बळी पडू नये अशा महत्त्वपूर्ण सूचना श्री ढिकले यांनी यावेळी उपस्थित जेष्ठ नागरिकांना केल्या.

# आय एम ए वुमंन्स डॉक्टर विंगची राज्यस्तरीय परिषद उत्साहात संपन्न

**महिलांच्या आरोग्यासह मानसिक स्वास्थ्यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन**
**राज्यभरातील ४५० हून अधिक महिला डॉक्टरांचा सहभाग**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महिलांच्या आरोग्याशी निगडित विविध वैद्यकीय, मानसिक व सामाजिक प्रश्नांवर सखोल मंथन घडवून आणणारी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) महिला डॉक्टर विंगच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय ईव्हिकॉन २०२६परिषद उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राज्याच्या विविध भागांतून ४५० हून अधिक महिला डॉक्टरांनी परिषदेत सहभाग नोंदविला.

परिषदेचे उद्घाटन आयएमए महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी, भावी अध्यक्षा डॉ. मंजुषा गिरी धनश्रीताई विखे पा.यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. याप्रसंगी डॉ. विक्रांत देसाई, डॉ. अरविंद गिते, डॉ. रश्मी मेहता, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे अध्यक्ष डॉ. संजय कदम, उपाध्यक्ष डॉ. राहुल कुलकर्णी, भावी अध्यक्षा डॉ. उज्ज्वला दहिफळे,अध्यक्ष डॉ.ज्योत्स्ना डौले डॉ. ऋतु लोखंडे, डॉ. श्वेतल सोमाणी, डॉ. निसार शेख, डॉ. रजिया निसार, डॉ. सागर झावरे, डॉ. सोनल बोरुडे यांच्यासह राज्यातील अनेक मान्यवर डॉक्टर उपस्थित होते.

परिषदेत वैद्यकीय क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता, २१व्या शतकातील मातृत्व, नव्या पिढीच्या मुलांचे पालकत्व, मधुमेह व स्थूलता नियंत्रण, बहुकुपिका अंडाशय विकार, रजोनिवृत्ती व्यवस्थापन आणि डॉक्टरांच्या ताणतणावाचे व्यवस्थापन या समकालीन विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. तसेच स्तनाचा कर्करोग, गर्भाशयाशी संबंधित समस्या, महिलांचे मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीमुळे निर्माण होणारी आरोग्यविषयक आव्हाने या विषयावर चर्चासत्रे झाली.

महिलांच्या आरोग्याच्या विविध समस्या तसेच त्यांच्या मानसिक आरोग्याच्या प्रश्नांवर महिला डॉक्टरांनी एकत्र येऊन चर्चा करणे



काळाची गरज असल्याचे मत आयएमए महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

डॉक्टरांचे स्वतःचे आरोग्य, अत्यंत व्यस्त कामाचे वेळापत्रक आणि लहान मुलांची जबाबदारी या तिन्ही आघाड्या सांभाळून अशा प्रकारचे चर्चासत्र यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल धनश्रीताई विखे पा. यांनी आयोजकांचे अभिनंदन केले. भविष्यातही अहिल्यानगरमध्ये अशा प्रकारची चर्चासत्रे आयोजित करावीत. त्यासाठी विखे पाटील फाउंडेशनच्या वतीने सहकार्य केले जाईल, असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.

परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष डॉ. ज्योत्स्ना डौले, सचिव डॉ. सुमा वाघ, डॉ. प्रीती डुंगरवाल, उपाध्यक्ष डॉ. पद्मा कुलकर्णी , डॉ. संगीता कांडेकर, डॉ. रेणुका पाठक, डॉ. नीलम बागल, डॉ. मेघना पाटणकर, डॉ. कांचन रच्चा, डॉ. मंजिरी झेंडे, डॉ. क्रांती खालकर, डॉ. सुजाता नरवडे, डॉ. प्राजक्ता पारधे तसेच आयएमए महिला डॉक्टर विंगच्या सर्व प्रतिनिधींनी विशेष परिश्रम घेतले. आयएमए अहिल्यानगरचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी व सचिव डॉ. अमित करडे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

समारोपप्रसंगी डॉ. ऋतु लोखंडे यांनी मागील वर्षातील उत्कृष्ट कार्याचा आढावा सादर केला. डॉ. मंजुषा गिरी यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे अभिनंदन करून परिषदेच्या यशाबद्दल कौतुक केले.

# ज्ञानसंपदा शाळेत आंतरशालेय कथाकथन स्पर्धा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ज्ञानसंपदा शाळेमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची आंतरशालेय कथाकथन स्पर्धा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत शहर आणि परिसरातील विविध शाळांतील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

स्पर्धेचा सविस्तर निकाल

छोटा गट इयत्ता पाचवी ते सातवी

मराठी-- प्रथम रुही पिंगळे (रेणावीकर हायस्कूल) द्वितीय सक्षद लोखंडे ( ऑक्सिलियम स्कूल) तृतीय अनुष्का टकले ( ऑक्सिलियम स्कूल) उत्तेजनार्थ मृणाल कोळी (गॅलेक्सी स्कूल)

इंग्रजी -प्रथम देवकी शिरोळे (रामकृष्ण स्कूल) आलिशा शेख (अशोक भाऊ फिरोदिया) आरोही टेकाळे (श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल) उत्तेजनार्थ सौमित्रा कुलकर्णी (ऑक्सिलियम स्कूल)

विशेष उत्तेजनार्थ सिया साठे (ज्ञानसंपदा स्कूल)

हिंदी-- प्रथम रुद्र रासकर (रामकृष्ण स्कूल), द्वितीय नंदिश साखरवाडे (ऑक्सिलियम स्कूल), तृतीय पलक आनंदकर (रामकृष्ण स्कूल), उत्तेजनार्थ शुभ्रा होले (अशोक भाऊ फिरोदिया)

मोठा गट इयत्ता आठवी ते दहावी

मराठी --प्रथम मृण्मयी पादिर (श्री साई स्कूल), द्वितीय स्वरांजली किंबहुने (अशोक भाऊ फिरोदिया) तृतीय मिताली कुलकर्णी (रेणावीकर शाळा), उत्तेजनार्थ उर्वी शास्त्री (गॅलेक्सी नॅशनल स्कूल)

हिंदी- प्रथम चैताली चौगुले (रामकृष्ण स्कूल), द्वितीय सारा रणधीर (मॉडेल इंग्लिश स्कूल ),तृतीय अर्जुन पुरी ( ऑक्सिलियम स्कूल ), उत्तेजनार्थ अंश गुगळे (अशोक भाऊ फिरोदिया)

इंग्रजी प्रथम तनिष्का शहाणे ( ऑक्सिलियम स्कूल), द्वितीय आराध्या सुरपूरिया (भाऊसाहेब फिरोदिया), तृतीय आर्या जाधव (अशोक भाऊ फिरोदिया), उत्तेजनार्थ अभिनव ब्राह्मणे (अशोक भाऊ फिरोदिया)

परीक्षक म्हणून स्वाती रानडे, मयुरा केळकर(हिंदी), श्रुती फडके, आरुषा कोल्हटकर(इंग्रजी), प्रसन्न पाठक, तेजस अतितकर, अनघा अत्रे, निर्मला नगरकर. (मराठी) यांनी काम पाहिले.

सूत्रसंचालन प्रसाद बर्वे यांनी केले. तर या स्पर्धेचे नियोजन स्पर्धा समन्वयक श्रीमती स्वाती तवले यांनी सांभाळले. शाळेच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली या प्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विजेत्या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

(पान १ वरून)

## बालिकाश्रम रोडवर ५५ वर्षीय व्यक्तीचा भरदिवसा चाकूने भोसकून निर्घृण खून

घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जखमी चव्हाण यांना उपचारासाठी तत्काळ सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, तेथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

## सिगारेट चोरणारी आंतरजिल्हा टोळी जाळ्यात

विश्लेषणाच्या आधारे आरोपी पुणे परिसरात असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली.पोलिसांनी काळेवाडी आणि भोसरी परिसरात सापळा रचून व्यंकटेश उर्फ हर्षल परशुराम जाधव (रा.तायरा सोसायटी, नानेकरवाडी, चाकण, ता.खेड, जि.पुणे), गोविंद लालु रूपवते (वय २१, रा.सद्गुरूनगर, भोसरी, ता.हवेली, जि.पुणे), पीरप्पा उर्फ सचिन जगन्नाथ येरे (वय २२, रा.सद्गुरूनगर, भोसरी, ता.हवेली, जि.पुणे), संजय उर्फ पंकज सर्वन वर्मा (वय २०, रा.सद्गुरूनगर, भोसरी, ता.हवेली, जि.पुणे) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी हा गुन्हा त्यांचे साथीदार रूपेश उर्फ दादया भोसले (पूर्ण नाव माहित नाही रा.चाकण, ता.खेड, जि.पुणे) व गौरव वारे (पूर्ण नाव माहित नाही, रा.चाकण, ता.खेड, जि.पुणे) यांच्यासह केल्याचे सांगितले. तसेच, २८ सप्टेंबर रोजी दौंडयेथेही सिगारेट चोरी केल्याचे तपासात उघड झाले. चोरी केलेले सिगारेटचे बॉक्स त्यांनी पुण्यातील काही व्यापाऱ्यांना विकले होते. पोलिसांनी या खरेदीदारांकडून दोन्ही गुन्ह्यांतील चोरीचा सर्व मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील तपास श्रीगोंदा पोलीस करत आहेत.

## कोतवाली, कॅम्प व जामखेड हद्दीत अवैध गुटखा-मावा विक्रेत्यांवर छापे

जप्त केला असून, चार वेगवेगळ्या गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव यांच्या नेतृत्वाखाली दोन विशेष पथके तयार केली. दिनांक ६ आणि ७ ऑक्टोबर रोजी या पथकांनी गोपनीय माहितीच्या आधारे जामखेड, कॅम्प आणि कोतवाली या तीन पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच वेळी ४ ठिकाणी छापे टाकले. कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या कारवाईत नागरदेवळे येथील सचिन सुखदेव हराळे याच्याकडून ६३ हजार ७०८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात केडगावमधील शाहूनगरचा रहिवासी समीर शरीफ शेख हा आरोपी फरार झाला आहे.

जामखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन कारवाया करण्यात आल्या. पहिल्या कारवाईत भवरवाडी (ता. जामखेड) येथील अर्जुन गहिनीनाथ सोनटक्के याच्याकडून २८ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर दुसऱ्या कारवाईत पोकळेवस्ती (जामखेड) येथील श्वेत शिवाजी वीर याच्यावर कारवाई करत १ लाख १३ हजार १७६ रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. या दुसऱ्या गुन्ह्यात शिर्डीचा आशुतोष शामराव रहाणे आणि पाथरूड (ता. भूम, जि. धाराशिव) येथील किरण बोराडे हे दोघे आरोपी फरार आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये संबंधितांवर संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये एकूण चार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार अभिजीत अरकल, राहुल डोके, रोहित मिसाळ, शाहीद शेख, भगवान सानप, संदीप पवार, संतोष खैरे, विकास साळवे आणि रणजीत जाधव यांच्या पथकाने पार पाडली.

**कोतवाली हद्दीत अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त**

या मोहिमेतील सर्वात मोठी कारवाई कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. येथे पोलिसांनी तब्बल २ लाख ६६ हजार ९०५ रुपयांचा अवैध मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी झेंडा चौक (केडगाव) येथे राहणारा दीपक शिवाजी वांढेकर (मूळ रा. सालेवडगाव, ता. आष्टी) आणि समीर शरीफ शेख (रा. शाहूनगर, केडगाव) यांच्यावर कारवाई करण्यात आली. तर धाराशिवचा नितीन वैजीनाथ शिंदे, अहिल्यानगरचा सोहेल शेख आणि इतर काही खरेदीदार फरार आहेत.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पंचवीस वर्षाची कारकीर्द सकंल्प,संघर्ष आणि राष्ट्र सेवेसाठी समर्पित - पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे

आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडीया या माध्यमातून भारत उत्पादन तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाच्या क्षेत्रात अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न मोदीच्या नेतृत्वात झाल्यामुळेच स्टार्टअप्स संस्कृती संरक्षण उत्पादन इलेक्ट्रॉनिक्स सेमीकंडक्टर नवीकरणीय उर्जा आणि पायाभूत सुविधा यामध्ये भारताची स्वतंत्र ओळख जगामध्ये निर्माण झाल्याचा अभिमान मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी क्षेत्रात शेतकऱ्यांसाठी विविध कृषी योजनांमधून नव्या संधी उपलब्ध होत आहेत.युवकांच्या कौशल्याला संधी देण्यासाठी स्कील इंडीया,नारीशक्ती ही केवळ घोषणा न राहाता विकासाची शक्ती बनली पाहीजे हा विचार पंतप्रधानाच्या दूरदृष्टीने अधिक ठळक झाला असून बदलता भारत आणि भारताची जगातील बदलती प्रतिमा मोदींच्या नेतृत्वाखाली अधिक प्रभावी झाल्याचा अभिमान प्रत्येक देशावासीयांच्या मनामध्ये असल्याचे त्यांनी सांगितले. स्टॅच्यु ऑफ युनिटी पासून आयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराची केलेली उभारणी,तीन तलाखाच्या कायद्यातून मुस्लीम महीलांची सुटका किंवा ज्यासाठी शामाप्रसाद मुखर्जी यांचे बलिदान झाले ते ३७०कलम हटविण्याचा ऐतिहासिक निर्णय हा विकसित भारताचा एक नवा अध्याय या वाटचालीतून निर्माण झाला आहे.त्यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारताच्या निर्मितीचा संकल्प पूर्ण करण्यासाठी कटीबध्द होण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले

## जिल्हा बँकेच्या ५ जागा बिनविरोध होण्याचे संकेत

आबादास शंकरराव पिसाळ, देविदास विजयराव देशमुख, मंगेश रावसाहेब जगताप, मंजुषा राजेंद्र गुंड, ज्योती प्रकाश शिंदे, सुरेश भागवत साळुंके, किरण आण्णासाहेब पाटील, काकासाहेब लक्ष्मण तापकीर आणि कैलास शंकरराव शेवाळे यांचे अर्ज वैध ठरले आहेत. तर जामखेडमध्ये सचिन नवनाथ घुमरे, अमोल जगन्नाथ राळेभात आणि सुधीर जगन्नाथ राळेभात हे रिंगणात आहेत. त्यामुळे कर्जत-जामखेडच्या बदलत्या राजकीय समीकरणांचीही कसोटी लागणार आहे.

**राखीव मतदारसंघांतही दिग्गजांची गर्दी**

महिला मतदारसंघात एकूण ४४ अर्ज वैध ठरले असून त्यामध्ये मंजुषा गुंड, अनुराधा नागवडे, सोनल गायकवाड, सुप्रिया पाटील, अर्चना पानसरे, मीनाक्षी साळुंखे, अनुराधा जगताप, प्रणोती जगताप, प्रतिभा पाचपुते, रत्नमाला लंघे, हर्षदा काकडे आदींचा समावेश आहे.